सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ३ रे | अंक - ४४ वा | अमरावती (महाराष्ट्र) | बुधवार दि. ५ मार्च २०२५ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -५

## कंबख्त को यूपी भेज दो, इलाज हम करेंगे

## अबू आझमींवर योगी आदित्यनाथ भडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ लखनऊ** समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या एका विधानानंतर राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. 'औरंगजेब हा क्रूर प्रशासक नव्हता', असं विधान आमदार अबू आझमी केलं होतं. आता अबू आझमी यांनी केलेल्या विधानावरून उत्तर प्रदेशातही चांगलंच राजकारण तापलं आहे.



दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे अबू आझमी यांच्या विधानावरून चांगलेच भडकले आहेत. कंबख्तको णझ भेज दो, इलाज हम करेंगे, असं योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे.उत्तर प्रदेशच्या विधानसभेत अबू आझमी यांच्या विधानावरून मोठा गदारोळ पाहायला मिळाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अबू आझमी यांना चांगलंच सुनावलं आहे. कंबख्तको उत्तर प्रदेश भेज दो, इलाज हम करेंगे, असं म्हणत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी योगी आदित्यनाथ यांनी समाजवादी पक्षावरही जोरदार टीका केली. समाजवादी पक्षाचे लोक औरंगजेबला आपला हिरो मानत असल्याचा हल्लाबोल योगी आदित्यनाथ यांनी केला.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाबाबत केलेल्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं की, अबू आझमी यांना (समाजवादी) पक्षातून काढून उत्तर प्रदेशला पाठवा. आम्ही त्यांचा इलाज करू, समाजवादी पक्षाने एकीकडे महाकुंभमेळ्याला दोष दिला आणि आता देशातील मंदिरे उद्धवस्त करणाऱ्या औरंगजेब सारख्या व्यक्तीची प्रशंसा समाजवादी पक्षाच्या एका आमदाराकडून होते, तरीही समाजवादी पक्षाकडून त्या विधानाचा निषेध का केला जात नाही?, अशा शब्दांत योगी आदित्यनाथ यांनी टीका केली आहे.-

## विधानसभेतून अबू आझमी निलंबित

### औरंगजेबाची प्रशंसा करणं भोवलंअधिवेशन संपेपर्यंत अबू आझमी यांचं निलंबन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई –** विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. पहिल्याच दिवशी आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब याच्यावर एक विधान केले होते. औरंगजेबाचे कौतुक केले होते. यावरुन विधिमंडळात गदारोळ उडाला होता. विरोधी पक्षातील आमदारांसह सत्ताधारी पक्षातील आमदारांनी अबू आझमी यांच्याविरोधात घोषणाबाजी सुरू केली होती. दरम्यान, आज अबू आझमी यांच्याविरोधात विधिमंडळात निलंबनाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. हा प्रस्तान सर्वानुमते मंजूर करण्यात आला असून अबू आझमी यांचे निलंबन करण्यात आले आहे.



आज विधिमंडळात मंत्री चंद्रकात पाटील यांनी आमदार अबू आझमी यांच्या निलंबानाचा प्रस्ताव मांडला. समाजवादी पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाची प्रशंसा केल्याच्या मुद्यावरून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये मंगळवारी प्रचंड गदारोळ झाला होता, सत्तापक्षाच्या आमदारांनी गोंधळ घालत कामकाज वारंवार बंद पाडले. शेवटी कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

दरम्यान, आता आज आझमी यांच्यावर निलंबणाची कारवाई करण्यात आली आहे.

विधानसभेत सभागृहाचे कामकाज तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी, तर विधान परिषदेत दोनवेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात येत असल्याचे अनुक्रमे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि सभापती राम शिंदे यांनी जाहीर केले. विधानसभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार, भाजपचे महेश लांडगे, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री उदय सामंत, अतुल भातखळकर, योगेश सागर यांनी अबू आझमींवर हल्लाबोल केला.

### घोषणांनी सभागृह दणाणले

भाजप-शिंदेसेनेचे आमदार वेलमध्ये उतरले आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'छत्रपती संभाजी महाराज की जय', अशा घोषणांनी त्यांनी सभागृह दणाणून सोडले. औरंगजेबाची महाराष्ट्रातील कबर उद्धवस्त केली पाहिजे, अशी मागणी मुनगंटीवार यांनी केली. उद्धव सेनेचे आमदारही शेवटी आक्रमक झाले आणि त्यांनीही घोषणाबाजी केली, त्यांच्यापैकी कोणाला बोलण्याची संधी मिळण्याआधीच कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

## 'धनंजय मुंडेंना आमदारकीपासून दूर ठेवा, त्यांचीही चौकशी करा'

### मनोज जरांगे पाटलांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई –** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येसंदर्भात बीड पोलिसांनी कोर्टात आरोप पत्र दाखल केले. यानंतर सोशल मीडियावर हत्येवेळी काढण्यात आलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. या आरोप पत्रात वाल्मीक कराड हा मुख्यआरोपी असल्याचे म्हटले आहे. यानंतर राज्यभरातून धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. धनंजय मुंडे यांनी काल मंत्रिपदाचा राजीनामा दिला. दरम्यान, आता मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांची आमदारकी काढून घेण्याची मागणी केली आहे.




जरांगे पाटील म्हणाले, बीड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे काम धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून करत होते का? देशमुख यांची हत्या झाल्यानंतर आरोपींनी मुंडे यांना फोन केला त्यांची चौकशी झाली पाहिजे. धनंजय मुंडे यांचं कार्यालय चालवण्याचं काम कराड करत होता. यासाठी मुंडे यांची चौकशी होणं अत्यंत गरजेचं आहे, असंही जरांगे पाटील म्हणाले. फरार आरोपीला पळून जाण्यासाठी मुंडे यांनी मदत केली. मोबाईल देखील फेकून दिला. देशमुख यांचा खून झाल्यापासून राजीनामा देईपर्यंतचे सर्व कॉल डिटेल्स समोर आले पाहिजेत, अशी मागणी जरांगे यांनी केली. धनंजय मुंडे यांचा पुरवणी जबाब घेणं अत्यंत गरजेचं आहे.यासाठी मंत्रिपद आणि आमदार पदापासून दूर ठेवलं पाहजे. ३०२ मध्ये अटक केली पाहजे, असंही जरांगे म्हणाले.

पाणी भरणाऱ्या जवळ एवढ्या मोठ्या गाड्या आहेत.बीएमडब्लू सारख्या गाड्या आहेत. हे कराड याचं नसावं हे मुंडे यांचं आहे. स्वतःला वाचवण्यासाठी मुंडे यांनी कराड याचा बळी दिला. जेलमध्ये सडायची वेळ आली हे कराड याच्या कुटुंबाला देखील कळलं असेल. कराड याने कोर्टात सांगावं खून,खंडणी,गुंडगिरी हे सगळं मुंडे मुळे केलं असं सांगावं, जे खर आहे ते बोललं पाहजे, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## राज्य सरकारने दिला दिलासा; प्रतिज्ञापत्रांसाठी लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई –** विविध प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी नागरिकांना मोठा खर्च करावा लागत होता. तो खर्चच आता राज्य सरकारने थांबविला आहे. विविध प्रकारची प्रमाणपत्रे काढण्यासाठी प्रत्येक अर्जासोबत नागरिकांना ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क जोडावे लागत होते. ते आता रद्द करण्यात आले आहे. यामुळे महागाईने पिचलेल्या जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या



नेतृत्वात घेण्यात आल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जाहीर केले आहे.

सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा चालू आहेत. जेव्हा या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची ही सर्व प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी झुंबड उडते. आतापर्यंत सर्व प्रमाणपत्रांसाठी किमान ३ ते ४ हजारांचा खर्च पालकांना लागायचा. यापुढे कसलेही मुद्रांक शुल्क न भरता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा ३ - ४ हजारांचा खर्च इथून पुढे होणार नाही. केवळ शैक्षणिकच नाही तर इतर अनेक कारणांसाठी प्रतिज्ञापत्र दाखल करताना ही सर्व प्रमाणपत्रे वेळोवेळी लागत असतात. त्यामुळे हा निर्णय राज्यातील कोट्यवधी नागरिकांसाठी लाभदायी असणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्याचे निर्देश मी महसूल खात्याच्या वतीने प्रशासनाला दिले आहेत, असे बावनकुळे यांनी एक्स अकाऊंटवर पोस्ट करत जाहीर केले आहे.

## कृषी मंत्री मंत्री माणिकराव कोकाटेंच्या शिक्षेला कोर्टाने दिली स्थगिती

### अजितदादांच्या आणखी एका मंत्र्याची विकेट पडता पडता वाचली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नाशिक–** राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने दिलासा दिला आहे. काही दिवसापूर्वी मंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला आता कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला जिल्हा व सत्र न्यायालय यांनी स्थगिती दिली आहे.कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू विजय कोकाटे यांच्या दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती देण्याबाबत राखून ठेवलेल्या निकालाची सुनावणी आज जिल्हा सत्र न्यायालयात झाली. या सुनावणीत कोकाटे बंधूंना मोठा दिलासा मिळाला आहे. आव्हान देणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळत ही सुनावणी आज ५ मार्च रोजी घेण्यात आली. यापूर्वी झालेल्या सुनावणीत कोकाटे यांच्यासह त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना कागदपत्र फेरफार अन् फसवणूक केल्याप्रकरणी दोषी



धरण्यात आले होते. १९९५ ते ९७ मध्ये सरकारच्या दहा टक्के कोट्यातून घर घेतल्याचा आरोप कोकाटे यांच्यावर आहे.या निर्णयाला कोकाटे यांनी आव्हान देत शिक्षा स्थगितीसाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यावर युक्तिवाद झाल्यानंतर कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देत १ मार्च रोजी यासंदर्भात निकाल देण्याचे जाहीर करण्यात आले होते. मात्र, त्याचदरम्यान शनिवारी सकाळी ड. सतीश वाणी आणि आशुतोष राठोड यांनी पुन्हा शिक्षेच्या स्थगितीला आदेश देणाऱ्या याचिका दाखल करीत त्यात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयांचा दाखला दिला. त्यानुसार शिक्षेची स्थगिती उठवून आ. कोकाटे यांची शिक्षा कायम ठेवावी, ही मागणी त्यात करण्यात आली होती. मात्र, जिल्हा व सत्र न्यायाधीश नितीन जीवने यांनी स्थगिती देण्याची याचिका फेटाळत याचिका कर्त्यांना वरिष्ठ न्यायालयात हरकत दाखल करण्यासाठी तीन दिवसांची मुदत देण्यात आली. तीन दिवसांत तुम्ही उच्च न्यायालयात जा अथवा ५ मार्च रोजी निकाल जाहीर करणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले.

## राज्यातील उर्दू शाळा सेमी इंग्रजीत रूपांतरित करण्याचा अल्पसंख्याक आयोगाचा सरकारला प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नागपूर–** राज्यातील सर्व उर्दू माध्यमांच्या शाळा सेमी इंग्रजीत रूपांतरित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग राज्य सरकारला सादर करणार आहे. उर्दू शाळांमध्ये मराठी विषय शिकवणे अनिवार्य करण्याची मागणीदेखील आयोग सरकारकडे करणार आहे.

राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी अल्पसंख्याक समाजातील विचारवंत, शैक्षणिक



क्षेत्रात काम करणारे प्रतिनिधी व उर्दू शाळांमधील निवडक शिक्षक प्रतिनिधींची बैठक घेत 'उर्दू शाळांचे भवितव्य व आव्हाने', या विषयावर चर्चा केली. बैठकीत उर्दू शाळांच्या सद्यःस्थितीवर चिंता व्यक्त करण्यात आली. अनेक उर्दू माध्यमांच्या शाळांमधील शिक्षणाचा स्तर खालावत चालल्याची चिंता अनेक जाणकारांनी व्यक्त केली. अनेक उर्दू शाळांमधील विद्यार्थ्यांना स्वतःचे नावदेखील नीट लिहिता येत नाही. अन्य शाळांच्या तुलनेत उर्दू माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थी स्पर्धेत कायम मागे राहत असल्याची खंत जाणकारांनी व्यक्त केली.

### उर्दू शाळेत मराठी सक्तीची करण्याचीही मागणी

महाराष्ट्रात सरकारी नोकऱ्या आणि स्पर्धा परीक्षांसाठी मराठी अनिवार्य आहे. मात्र, उर्दू शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना मराठीचे ज्ञान नसते. यामुळे अनेक मुस्लीम विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षांमध्ये टिकाव लागू शकत नसल्याची खंत बैठकीत व्यक्त करण्यात आली. त्यामुळे सर्व उर्दू शाळांमधून मराठी विषय अनिवार्य स्वरूपात शिकवला जावा, असाही प्रस्ताव आयोग सरकारला सादर करणार आहे

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावरच नव्या काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांची नवी रणनीती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई–** लोकसभा, विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. यासाठी सर्वच राजकीय पक्ष आपापली रणनिति आखत आहेत. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नव्या प्रदेशाध्यक्षांनी देखील त्यांची रणनीती आखली आहे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काँग्रेस स्वबळावरच लढवणार असल्याचं दिसत आहे.महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे निरीक्षक प्रत्येक प्रभागात, वार्डात जावून आघाडी करायची का? स्वबळावर निवडणूक लढवायची? याबाबतची विचारणा काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना आणि स्थानिक पदाधिकारी यांना करत असल्याचं समोर आलं आहे.काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांचे मत लक्षात घेऊन या सर्व निरीक्षकांना एक अहवाल तयार करायचा आहे. तो अहवाल



प्रदेशाध्यक्षांकडे जाणार आहे. या अहवालानुसार प्रदेशाध्यक्ष काँग्रेस हायकामांशी चर्चा करून मग स्वबळाबाबत निर्णय घेणार आहेत. सद्य परिस्थितीला बहुतांश प्रभागातून स्वबळावरच निवडणु का लढाव्यात, असा स्वर काँग्रेस कार्यकर्त्यांकडून येत असल्याचं सांगितलं जात आहे.निरीक्षकांनी प्रत्येक प्रभागात जाऊन त्या ठिकाणची राजकीय समीकरणे, सामाजिक समीकरणे काय आहेत. त्याठिकाणी सक्षम उमेदवार किती आणि कोण आहेत? याची पाहणी कारायची आहे. तसेच त्या भागातील आमदार, माजी आमदार, माजी नगरसेवक इतर कमिटांच्या सभासदांची चर्चा करून त्या प्रभागामध्ये महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढणं योग्य राहील की स्वबळावर निवडणूक लढवावी? त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे.

## संपादकीय ......

# विकृती ठेचाच, पण सजगही व्हा

पुण्यात स्वारगेटसारख्या गजबजलेल्या भागात, पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या एसटीच्या आगारातील एका बंद बसमध्ये तरुणीवर बलात्काराचा प्रसंग महिलांच्या सुरक्षेच्या प्रश्नांकडे नव्याने रोख वळवणारा आहे. भल्या सकाळी घडलेल्या या घटनेमध्ये मुलीने अपरिचित व्यक्तीवर टाकलेला विश्वासही डोळेझाक करण्याजोगा नाही. म्हणजेच समाज आणि यंत्रणेबरोबरच महिलांनीही स्वत:ला संरक्षित ठेवायला हवे.

महिलांसंबंधी विनयभंग, अत्याचार, हिंसाचार वा बलात्कारासारख्या घटनांची वाढती वारंवारता बघता हे प्रकार कमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या सर्व उपाययोजना फोल वा सपशेल अपयशी ठरत असल्याची भीती बळावल्याखेरीज राहत नाही. दिवसाच्या कोणत्याही प्रहरामध्ये, घरात अथवा घराबाहेर महिला असुरक्षित असल्याचे जळजळीत वास्तव अशा घटनांमधून पुढे होते. पुण्याच्या स्वारगेट आगारासारख्या गजबजलेल्या ठिकाणी पहाटेच्या वेळी तरुणीवर झालेल्या बलात्काराची घटना हाच प्रश्न अधोरेखित करते. स्वारगेट पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या या स्थानकातील शिवशाही बसमध्ये नराधमाने केलेल्या अत्याचारामध्ये गावी निघालेल्या एका तरुणीने हा जीवघेणा प्रसंग अनुभवला आणि घटनेची तक्रार दाखल केल्यामुळे हे प्रकरण चर्चेत आले. मात्र फसवणुकीतून जाळ्यात अडकणाऱ्या, 'ताई'अशा संबोधनामुळे अपरिचीताच्या मिठास बोलीला फसून त्याचे भक्ष्य ठरणाऱ्या अशा किती मुली असतील याचा थांग लागणे अशक्य आहे.

लवकरच या प्रकरणी अधिक माहिती समोर येईल. तसेच दोषीला पकडण्याची कारवाई पूर्ण होऊन योग्य ती शिक्षा ठोठावली जाईल. मात्र याने प्रश्न सुटणार नाही. कारण महिला परक्या व्यक्तीवर, त्याच्या मिठास वाणीवर किती भोळा विश्वास ठेवतात हे अशा घटना दाखवतातच, खेरीज आगारातील बंद गाड्यांमध्ये नेमके कोणकोणते गैरप्रकार चालतात, त्याला सुरक्षारक्षकांची मूक साथ कशी लाभते, लाखो रुपये खर्च करून बसवण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची स्थिती काय आहे, तरुणीने लगेचच मदत मागत आरडाओरडा केला असता, तर तिला साथ मिळाली असती का अशा एक ना अनेक प्रश्नांना ही घटना जन्म देते. संबंधित प्रकरणानंतर पीडित तरुणी दुसऱ्या एसटीने आपल्या गावी जाण्यास निघाली होती. मात्र वाटेमध्ये तिने हा सगळा प्रकार आपल्या मित्राला सांगितला आणि त्याच्या सल्ल्यानुसार उतरून पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. त्यानंतर तपासाची सूत्रे वेगाने हलली आणि सीसीटीव्ही फुटेजद्वारे मिळालेल्या माहितीवरून दत्तात्रय गाडे नामक सराईत गुन्हेगाराची ओळख पटवली आणि त्याला शोधण्यासाठी आठ पथके रवाना झाली. त्याच्यावर यापूर्वीही साखळीचोरी वा चोरीसारखे गुन्हे आहेत. शोधादरम्यान त्याच्या घरातून भावाला ताब्यात घेण्यात पोलिसांना यशही मिळाले. पुढचा घटनाक्रम समोर आहेच, मात्र या सगळ्या पार्श्वभूमीवर महिलांकडून वारंवार होणाऱ्या चुकांचा, दुसऱ्यावर अनाठायी विश्वास ठेवण्याच्या वृत्तीचाही विचार व्हायला हवा.

सदर घटनेमध्ये आरोपीने एकटीने प्रवास करणारी ही तरुणी हेरून 'ताई' अशी साद घातली आणि आपण या बसचे वाहक असल्याचे तसेच गेली १५ वर्षे हे काम करत असल्याचे सांगितले. त्यामुळेच बस नेहमीच्या फलाटावर लागलेली नसताना, त्यात कोणताही प्रवासी नसताना, बसमधील लाईट बंद असतानाही तरुणी आतमध्ये गेली. पाठोपाठ आरोपीही शिरला आणि दार लावून घेत, जीव घेण्याची धमकी देत हे पाशवी कृत्य केले. खरे तर हे स्थानक वर्दळीचे ठिकाण असून चोहीकडे सुरक्षा यंत्रणा आहे. सुरक्षारक्षकांची केबिनही आहेत. मात्र अशा ठिकाणी खातरजमा करून न घेता संबंधित तरुणीने अनोळखी व्यक्तीशी काही काळ संवाद साधला आणि बसमध्ये बसली. म्हणजेच इथे सुरक्षारक्षकांनी आपले काम चोख केले असते आणि संबंधित मुलीनेही अपरिचित व्यक्तीवर विश्वास न ठेवता संबंधित यंत्रणेकडे विचारपूस केली असती, तर कदाचित ती या दुर्घटनेतून वाचली असती असे म्हणावे लागेल. या निमित्ताने आगारात बंद पडलेल्या बसेसची तपासणी करता अनेक आक्षेपार्ह गोष्टी सापडल्या. त्यात महिलांचे कपडे, दारुच्या बाटल्या, गुटख्याची पाकिटे, शर्ट, अंतर्वस्त्र आणि गर्भनिरोधके सापडल्यानंतर इथे रोज काय घडत असावे, हा प्रश्न समोर येतो. हे चित्र विदारक स्थिती समोर आणत असून त्यात एसटीचे कर्मचारीही सहभागी आहेत का, हा प्रश्न विचारला जात आहे. ही केवळ स्वारगेट बसस्थानकातील परिस्थिती नसून सार्वजनिक ठिकाणी जागोजागी बंद पडलेल्या बसेस वा अन्य वाहने बघायला मिळतात. गैरकृत्य करणारे त्यांचा अयोग्य कारणासाठी सर्रास वापर करताना दिसतात. मात्र यंत्रणा वा स्थानिक त्याकडे दुर्लक्ष करतात. स्वाभाविकच त्यांना रान मोकळे मिळते आणि अनेक दुर्दैवी जीव त्यात अडकतात. हे गांभीर्य आता तरी लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे जुन्या वाहनांची ताबडतोब विल्हेवाट लावण्याची गरजही समोर आली आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पुरुषांची स्त्रीकडे बघण्याची मानसिकता बदलण्याची गरज तीव्रतेने जाणवतेच, खेरीज तरुणींनी अशा घटनांपासून वाचण्यासाठी काही काळजी घेणे गरजेचे वाटते. कारण अशा घटनांचा वाढता धसका वा भीतीतून होणारे मानसिक तसेच शारीरिक जखमांचे परिणामही खूप मोठे असतात. म्हणूनच मुलींनी आपल्या सुरक्षेच्या बाबतीत वेळीच जागरूक राहून काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी. जसे की, एकटीने बाहेर पडताना सार्वजनिक ठिकाणी नेहमी लोकांसोबत राहावे. बरोबर कोणी नसले तरी ते दर्शवून देऊ नये. परक्या माणसावर विश्वास ठेवणे, त्याला वैयक्तिक माहिती सांगणे, त्याच्याबरोबर मैत्रीपूर्ण वागणूक ठेवणे संकटाला आमंत्रण ठरू शकते. मुख्य म्हणजे प्रवेश करण्याआधी त्या ठिकाणाची सुरक्षा आणि सुरक्षेसाठीचे मापदंड तपासून पाहावेत. दुसरी बाब म्हणजे आपले रक्षण करण्यासाठी काही आत्मसुरक्षा तंत्र शिकणे महत्त्वाचे आहे. मार्शल आर्टस किंवा स्वयंविकसन अभ्यास ही सध्याच्या काळाची मुख्य गरज बनली आहे. यामुळे तुम्ही कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देऊ शकता. पळून जाणे, मोठ्याने आवाज काढणे आणि आसपासच्या लोकांची मदत घेणे यातूनही तुम्ही स्वतःचे संरक्षण करू शकता. अशा घटना टाळण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य ठरतो आहे. स्मार्टफोनमध्ये सुरक्षा वाढवण्यासाठी सध्या अनेक प्स उपलब्ध आहेत. तेव्हा खात्रीशीर प्स वापरून तपासणी करत राहणे आणि संकटाच्या वेळी संबंधित लोकांना त्वरित सूचित करणे हादेखील एक कामी येणारा उपाय आहे. यामध्ये लोकेशन इतर लोकांसोबत शेअर करणे किंवा एका क्लिकमध्ये मदतीसाठी कॉल करणे ही सुविधा असू शकते. प्रसंगावधान राखून, चातुर्याने त्याचा उपयोग करता येईल. आपल्यावर वाईट प्रसंगाला तोंड देण्याची वेळ येऊ शकते हे लक्षात घेत सुरक्षिततेसाठी शारीरिक आणि मानसिक तयारी महत्त्वाची आहे. तेव्हा आपले शरीर काय सांगते ते ऐकायला हवे. तुम्ही कुठेही असला तरी तिथली परिस्थिती, लोकांची मानसिकता आणि वातावरण कसे आहे यावर लक्ष ठेवणे आज अत्यावश्यक बनले आहे. कुठेही असुरक्षित वाटत असल्यास संबंधित ठिकाण त्वरित सोडून बाहेर पडणे योग्य ठरते. मुख्य म्हणजे कोणत्याही स्थितीमध्ये शंका किंवा भीती वाटत असल्यास त्वरित मदतीसाठी जोरात ओरडायची खबरदारी महिलांनी जरुर घ्यावी. एखाद्या अनोळखी व्यक्तीसोबत जायची वेळ आल्यास आणि त्याने चुकीचे वागणे सुरू केल्यास त्वरित विरोध करायला मुलींना शिकवायला हवे.




## दररोज सकाळी खा इतके बदाम, शरीराला मिळतील हे मोठे फायदे

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक १**बदाम आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असतात. यात प्रोटीन, फायबर, व्हिटामिन्स, मिनरल्स तसेच ओमेगा ३ फॅटी ॲसिड असते. ही

**हे होतात फायदे** – शरीरासाठी गरजेची पोषकतत्वे आहेत. यामुळे दररोज सकाळी आपल्याला बदाम खाल्ले पाहिजेत. रात्रभर पाण्यात भिजवलेले बदाम सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्याने अनेक समस्यांचा बचाव होतो.



बदाम खाल्ल्याने बॅड कोलेस्ट्रॉल याला लो डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणतात त्याचा स्तर कमी होण्यास मदत होते. तसेच चांगले कोलेस्ट्रॉल वाढते. बदामामध्ये सूजविरोधी गुण असल्याने तुम्हाला हृदयरोगापासून बचाव होण्यास मदत होते.

**वजन नियंत्रणात राहते**– बदामामध्ये कॅलरीजचे प्रमाण अधिक असते. मात्र बदामामध्ये वजन वाढण्याची आणि लठ्ठपणाची जोखीम कमी करण्यास मदत होते.

**ब्लड शुगर राहते नियंत्रणात**– डायबिटीजच्या रुग्णांना आपली साखर नियंत्रणात ठेवणे गरजेचे असते. बदामाचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. यात फायबरही असतात. यामुळे ब्लड शुगर कंट्रोल करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी फायदेशीर**– बदामामध्ये प्रोटीन, व्हिटामिन्स, मिनरल्स, फायबर आणि ओमेगा ३ फॅटी ॲसिड असतात. त्यामुळे हे खाल्ल्याने स्किन हेल्दी राहण्यास मदत होते.

# राष्ट्रीय कार्यक्रमात जि. प. आरोग्य अकोला विभाग राज्यात आघाडीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अकोला–** राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा गुणानुक्रम ठरविण्यात येतो. त्यात अकोल्याचा जि. प. आरोग्य विभाग गतवर्षी ७ वेळा प्रथम क्रमांकावर राहिला आहे.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार डिसेंबर २०२४ चे गुणानुक्रम राज्य स्तरावरून काढण्यात आले. त्यात अकोला जि. प. आरोग्य विभागाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. जिल्ह्याने एप्रिल ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्याच्या कालावधीत तब्बल सातवेळा राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

राष्ट्रीय कार्यक्रमात महत्त्वाच्या काही आरोग्य निर्देशांकाद्वारे संपूर्ण राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा शल्यचिकित्सक , महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कामाचे राष्ट्रीय कार्यक्रमातर्गत लसीकरण, माता बाल संगोपन, आरसीएच पोर्टल ,आयडीएसपी, एनसीडी ,कुटुंब कल्याण कार्यक्रम ,क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम इत्यादी महत्त्वाचे निर्देशांकाचे गुणानुक्रम राज्यस्तरावरून काढण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी व उपसंचालक आरोग्य डॉ. कमलेश भंडारी मार्गदर्शनानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आणि त्यांचे सहकारी यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले. विभागाकडून नियमित आढावा, पाठपुरावा, प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामात सुधारणा करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांवर पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार आरोग्य सेवक, सेविका यांच्या कामात सुधारणा आदी कामे साध्य झाली. कार्यात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशीकांत पवार, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, तालुका आरोग्य अधिकारी ,वैद्यकीय अधिकारी ,सर्व आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका यांचा सहभाग आहे.

## शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ सादर करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फ्रीशिप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांनी अर्ज तातडीने सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०११–१२ ते २०१७–१८ कालावधीतील महाईस्कॉल प्रणालीवरील नोंदणीकृत प्रलंबित, तसेच सन २०१७–१८ वर्षातील ऑफलाईन पद्धतीने स्विकारण्यात आलेल्या अर्जांचा समावेश आहे. अद्यापही महाविद्यालयांनी संबंधित प्रस्ताव इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयास सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांना कागदपत्रांसह अर्ज दि. १७ मार्च २०२५ पर्यंत सादर करावे लागणार आहे.

यात विलंब झाल्यास प्रस्ताव शासनास सादर करता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची जबाबदारी प्राचार्यांवर राहणार आहे, असे इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक गजेंद्र मालठाणे यांनी कळविले आहे.

# सद्यस्थितीत तापमानात मोठी वाढ; कशी घ्याल आंबा पिकाची काळजी? वाचा सविस्तर

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**

गेल्या काही दिवसांपासून उष्मा वाढल्यामुळे कैरी वाचविण्यासाठी बागायतदारांची कसरत सुरू आहे. उष्णतेमुळे आंबा भाजत असून, फळांवर काळे डाग पडले आहेत.ही फळे काही दिवसातच गळून पडतात. गळ मोठ्या प्रमाणात झाल्यास आधीच कमी असलेल्या उत्पादनात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

आंबा फळावर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसुन येण्याच्या शक्यता आहे. अश्या वेळी बागेमध्ये गळलेली फळे गोळा करुन नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशीपासुन संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले फळमाशी रक्षक सापळे प्रति एकरी २ याप्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजुच्या फांद्यावर लावावेत.

गेल्या ८ दिवसांपासुन कृषि हवामान वेधशाळेत कमाल तापमानाची नोंद ३७ अंश सेल्सिअस एवढी झालेली आहे. तसेच परिसरात उष्णता लाटे सदृष परिस्थिती असल्याने किनारी भागातील मोठ्या आकाराची साधारणतः अंडाकृती फळे प्रखर सुर्यप्रकाशामुळे भाजुन चट्टे पडत आहेत (सनस्कॅल्ड) तरी आंबा फळांचे प्रखर सुर्यप्रकाशापासुन संरक्षण करण्यासाठी आणि फळांचा आकार व वजन वाढुन डाग विरहीत फळांच्या उत्पादनासाठी फळधारणेनंतर १ महिन्याने साधारणतः फळे गोटी ते अंडाकृती असताना फळांवर २५x२० सेमी आकाराच्या कागदी पिशव्यांचे आवरण घालावे.




आंबा फळांचे फळमाशींपासुन संरक्षण करण्यासाठी आणि फळांचा आकार व वजन वाढुन डाग विरहीत फळांच्या उत्पादनासाठी वरील दिल्याप्रमाणे कागदी पिशव्यांचे आवरण घालावे.

तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे तापमानात वाढ होते. आणि बाष्पोत्सर्जनाचा दर वाढल्याने पिकावर पाण्याचा ताण निर्माण होऊन फळे अकाली गळतात. सांद्रीभवन व बाष्पीभवन प्रक्रियेतील वाढीमुळे आंब्याच्या झाडांना पाण्याची गरज भासते. अशातच मृदेतील ओलाव्या अभावी झाडांना पुरेशा प्रमाणात पाण्याचा पुरवठा न झाल्याने नविन फळधारणा झालेल्या





फळगळ होण्याची शक्यता असते. म्हणुन फळधारणा झालेल्या आंबा बागेमध्ये वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळाची गळ कमी करण्यासाठी,पाण्याच्या उपलब्धतेनुसार १०० लिटर पाणी दर झाडाला आठवड्यातून एकदा किंवा १० लिटर बागांमध्ये प्रतिदिन द्यावे, तसेच जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करा.

हापुस आंब्यामध्ये फळगळ कमी करण्यासाठी फळे वाटाण्याच्या आकाराची झाल्यावर २० पीपीएम नॅप्थेलीन ॲसीटीक ॲसीड (१ ग्रॅम ५० लिटर पाण्यातुन) या संजिवाचे द्रावण मोहोरावर फवारावे. दुसरी फवारणी फळे गोटीच्या आकाराची झाल्यावर करावी. नॅप्थेलीन ॲसीटीक ॲसीड प्रथम थोड्या अल्कोहोलमध्ये विरघळुन नंतर पाण्यात मिसळावे.

चांगल्या प्रतिच्या आंबा फळाच्या उत्पादनाबरोबर आंब्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी १% पोटॅशिअम नायट्रेटची (१० ग्रॅम प्रति लिटर पाणी) फळे वाटाणा, गोटी व अंडाकृती अवस्थेत असताना अशा एकुण ३ फवारण्या कराव्यात.–









# मेळघाटातील चाकर्दा येथे भीषण आग; संपूर्ण वस्ती जळून खाक, अनेक कुटुंब उघड्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मेळघाट–** धारणी तालुक्यातील नागढाना येथील नवी वस्ती चाकर्दा येथे मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास भीषण आगीची दुर्घटना घडली. या अचानक लागलेल्या आगीत एका रांगेत असलेल्या ७ पेक्षा जास्त घरे पूर्णतः जळून खाक झाले आहे. तर अन्य २ घरांचेही मोठे नुकसान झाले आहे.

नागढाना येथील चाकर्दा परिसरात लागलेली आग एवढी भयावह होती की काही क्षणातच संपूर्ण वस्तीने पेट घेतला अनेक नागरिक घरात नसल्याने जीवितहानी टळली असली तरी त्यांचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाला आहे. या भीषण आगीत घरातील दुचाकी, गॅस सिलेंडर, कपाटातील दागिने, कपडे, जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य आणि शेतातून आणलेली तूरही भस्मसात झाली. सततच्या कष्टाने उभारलेली घरे एका रात्रीत संपून गेली, त्यामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर आली आहे. स्थानीय प्रशासन आणि गृहनिर्माण विभागाने त्वरित मदत जाहीर करावी अशी नागरिकांची मागणी आहे.या आगीमुळे सर्वत्र गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती.अग्निशमन विभागाच्या अथक प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली असली तरी मात्र आदिवासी कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.







RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ५ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे रोल मॉडेल, ४० लाखांचा पुरस्कार ग्रामपंचायतीला मिळाला

## आर. आर. आबा पाटील सुंदर गाव योजनेत एरंडगाव ग्रामपंचायत जिल्ह्यामधून प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नांदगाव खंडेश्वर –** आदर्श गाव ग्रामपंचायत एरंडगावला आर. आर. (आबा) पाटील सुंदर गाव योजने अंतर्गत जिल्हास्तरीय ४० लाखांचा प्रथम पुरस्कार जाहीर केला आहे.

तालुकानिहाय प्रथम क्रमांक प्राप्त जिल्ह्यातील १४ ग्रामपंचायती अंतर्गत सुंदर गाव पुरस्कार योजनेतील कामांची पाहणी जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी भेट देऊन केली होती. या दरम्यान सुंदर गाव योजनेअंतर्गत मुद्दे निहाय रेकॉर्ड पडताळणी केली.

ग्रा.पं.ची इमारत, ग्रामस्थांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी आरओ प्रणाली, पाणी शुद्धिकरणांतर्गत क्लोरीनेशन प्रकल्प, शासकीय इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर, प्रत्येक घराला शोषखड्डा, बायोगॅस प्रकल्प, बचत गटांचे व्यवसाय, गटासाठी ग्राम संघाचे कार्यालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, सार्वजनिक स्वच्छतागृह, गावावर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे, हॅण्ड वॉश स्टेशन, प्रत्येक घरावर लावलेले नावांचे फलक, युपीएससी व एमपीएससीचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी अद्ययावत पुस्तकासह अभ्यासिका, क्रीडांगण, उद्यान,वृक्ष लागवड, जलसंधारणाची कामे, सर्व शासकीय योजनेचे फलक, कर वसुली, बंदिस्त गटारे, ग्रामपंचायतीची स्वतंत्र वेबसाईट व त्यावर अपलोड केलेली गावातील सर्व योजनांची जमाखर्चासह माहिती, एसएमएसद्वारे ग्रामस्थांना ग्रामसभा व इतर संदेश पाठवण्याची संदेश प्रणाली, ग्रामपंचायतीचे १ ते ३३ नमुने ऑनलाइन प्रणालीवर अद्ययावत करणे, एक ते अकरा आज्ञावलीत अद्यावत माहिती ऑनलाइन करणे, लोकवर्गणीतून वृक्ष लागवड शासकीय इमारतीची लोकवर्गणीतून नुतनीकरण शासकीय जमिनीमधून ले-आउट करून वाटप केलेले भूखंड, उत्कृष्ट घरकूल, सौर ऊर्जा प्रणाली वरील पथदिवे, आदी कामांची सुंदर योजनेचे निकषासह ग्रामपंचायत एरंडगाव येथील कामांची पाहणी केली होती. यात एरंडगावनेबाजी मारली. ग्रामपंचायत एरंडगाव सुंदर गाव तयार करण्याचे श्रेय सरपंच माया घोडे, उपसरपंच गौतम गडलिंग, पांडुरंग घोडे, ग्रामपंचायत सदस्य संदीप भले, लिलाधर झिमटे, अश्विनी पुंड, सुनीता बंड, वैशाली गभ्ने, ग्रामपंचायत अधिकारी ज्योत्स्ना इसळ यांना जाते. गावकऱ्यांनी केलेल्या कामाचे अचूक मूल्यमापन केल्याबाबत – ग्रामस्थांनी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत बाळासाहेब बायस व पथकाचे आभार मानले.



### ग्रामस्थांनी सहकार्याने साकारले आदर्श ग्राम

ग्रामपंचायत तपासणीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने साकार केलेल्या आदर्श गावाला शुभेच्छा देऊन गावकऱ्यांचे कौतुक करून नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील ग्रामपंचायत एरांडगाव गाव हे अमरावती जिल्ह्याकरता विकास कामाचे रोल मॉडेल ठरणार असल्याचे जाहीर केले होते. ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीला पूर्ण सहकार्य केल्यामुळेच हे गाव आदर्श बनल्याचे त्या म्हणाल्या होत्या.

# अकोल्यात वंचितच्या बड्या माजी महिला नेत्याच्या नातीचे अपहरण

## पोलिसांकडून शोध सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अकोला –** राज्यात गुन्हेगारी प्रचंड प्रमाणावर वाढली आहे. आधी सामान्य लोकांना याचा त्रास होत होता, आता राजकारण्यांच्या घरापर्यंत गुन्हेगार पोहोचू लागले आहेत. पुण्यातील केंद्रीय मंत्र्याच्या कर्मचाऱ्याला मारहाण, भाजपच्या एका महिला खासदाराच्या मुलीची छेडछाड आणि आता अकोल्यात वंचितच्या बड्या महिला नेत्याच्या नातीचे अपहरण अशा घटनांनी महाराष्ट्र हादरू लागला आहे.



अकोल्यात वंचित बहुजन आघाडीच्या महिला आघाडीच्या एका माजी बड्या महिला नेत्याच्या नातीचे अपहरण करण्यात आले आहे. अकोल्यातल्या कृषी नगर भागातल्या एका नामांकित इंग्लिश स्कूल परिसरातून या १२ वर्षीय मुलीचे अपहरण झाले आहे. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मंगळवारी रात्री मुलीच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती.

पोलिसांनीही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास सुरु केला आहे. मुलीच्या शोधासाठी दोन पथक स्थापन करण्यात आली आहेत. अगदी गजबजलेल्या वस्तीतून दुपारी ३ वाजताच्या सुमारास मुलीच अपहरण झाल्याने खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी रात्रीपर्यंत पाच ते सहा जणांची चौकशी केली आहे. काहीही करा पण माझ्या नातीला शोधून द्या, असा टाहो अपहरण झालेल्या मुलीच्या आजीने पोलीस स्टेशन परिसरात फोडला होता. ही अल्पवयीन मुलगी शाळा सुटल्यानंतर शाळेबाहेर गेली होती. ती घरी परतली नाही. यामुळे तिचे वडील पोलिस ठाण्यात आले होते. पोलीस तपास करत आहेत. जर कोणी तिला फुस लावून नेले असेल तर तिचा शोध घेऊन आरोपीला पकडण्यात येणार असल्याचे जयवंत सातव, ठाणेदार, सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन, अकोला यांनी सांगितले आहे.

# ६० हजार मजूर, ६२ कोटी अडकले, स्थलांतर वाढले

## होळीपूर्वी मजुरांचे वेतन देण्याची मागणी : केवळराम काळे यांचे पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चिखलदरा :** मेळघाटच्या धारणी व चिखलदरा तालुक्यातील जवळपास ६० हजार मजुरांचे ६२ कोटींपेक्षा अधिक मजुरीची रक्कम न मिळाल्याने त्यांची होळी अंधारात जाण्याची भीती वर्तविलया जात आहे 'मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुंबई येथे भेट घेऊन पत्र दिले आणि निधीची मागणी केली.मेळघाट विधानसभा क्षेत्र हा आदिवासी बहुल भाग असून चिखलदरा व धारणी तालुक्यातील मजूर वर्ग महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून कामे करीत आहेत. परंतु मेळघाटमधील मजुरांची मजुरी ही मागील चार ते पाच महिन्यांपासून अद्यापपर्यंत मिळालेली नाही. मजुरांना उदरनिर्वाह करणे कठीण होऊन बसल्याने मेळघाटमधील मजुरांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होत आहे.



### तीन महिन्यांपासून वेतन नाही

मागील तीन महिन्यांपासून मेळघाटातील आदिवासी मजुरांचे वेतन मिळाले नाही. वेतन मिळावे यासाठी आदिवासींनी ताला ठोको आंदोलन झाले. तरीसुद्धा प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. आमसभेत लाडकी बहिणीच्या पैशाच्या भरवशावर घरदार चालत असल्याचे आदिवासी महिला सरपंचाने सांगितले. यावेळी तत्काळ मजुरांना त्यांचे वेतन देण्याची मागणी मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

### शासन निर्णयाची आठवण, होळी सण

शासन निर्णयाप्रमाणे मजुरांना १५ दिवसांपर्यंत मजुरी मिळणे अपेक्षित असताना व आदिवासी बांधवांचा सर्वात मोठा मुख्य सण होळी असून मजुरी न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. तरी आपण १३ मार्च रोजी होणाऱ्या होळी सणापूर्वी रोहयोचे काम करणाऱ्या मजुरांचे पगार देण्याची मागणी आ. काळे यांनी केली आहे.

# १५७५ शाळा आणि शेकडो शिक्षकांवर टांगती तलवार ; जि.प.शाळा बंद होणार का?

## झेडपी शाळांवर ४८५३ एचएम, शिक्षक कार्यरत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.५अमरावती : ४** महाराष्ट्र शासनाच्या नवीन संचमान्यतेच्या धोरणामुळे जिल्हा परिषद शाळांमधील ५०० हून अधिक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार असून अनेक शाळांचे अस्तित्व धोक्यात आले असून १५ मार्च २०२५ चा शासन निर्णय रद्द करण्याची मागणी शिक्षकांसह शिक्षक संघटनांनी केली आहे.

पूर्वी इयत्ता ६ वी ते ८ वी करिता ३६ विद्यार्थ्यांवर ३ शिक्षक मान्य होते. मात्र नवीन धोरणानुसार ७८ विद्यार्थ्यांमागे ३ शिक्षक असतील. यामुळे ज्या शाळांमध्ये ६ ते ८ वीच्या वर्गात २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तिथे शिक्षकच राहणार नाहीत. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या शाळेत स्थलांतर करावे लागणार आहे. या बदलामुळे एकट्या अमरावती जिल्ह्यातील ५०० हून अधिक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सध्या जिल्ह्यात जि. प. शाळांवर ३९६७ शिक्षक कार्यरत आहेत.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक १ हजार ५७५ शाळा आहेत. या शाळांमध्ये गरीब कुटुंबातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच पाच हजारांवर शिक्षक या शाळांमध्ये अध्यापनाचे कार्य करीत आहेत.



संचमान्यतेच्या नवीन धोरणानुसार ७८ विद्यार्थ्यांमागे ३ शिक्षक असतील. यामुळे ज्या शाळांमध्ये ६ वी ते ८ वीच्या वर्गात २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत तिथे शिक्षकच राहणार नाहीत. १५० पेक्षा कमी विद्यार्थी असतील तर तेथे मुख्याध्यापकाचे पदही राहणार नाही.२००९ पूर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांसोबतच खासगी अनुदानित शाळांमध्येसुद्धा इयत्ता ५ ते ७ वीसाठी ४५ विद्यार्थ्यांवर ४ शिक्षक होते. आता नवीन संचमान्यतेच्या निर्णयामुळे इयत्ता ६ वी ते ८ वीसाठी ७७ विद्यार्थ्यांमागे केवळ २ शिक्षक राहणार आहेत. राज्य शासनाच्या नवीन संचमान्यतेच्या धोरणामुळे जिल्हा परिषद शाळांवर संकट ओढवणार आहे. कारण अनेक शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या घटली आहे. याशिवाय नवीन धोरणात ७८ विद्यार्थ्यांमागे ३ शिक्षकांचा निकष लावल्यामुळे कमी पटसंख्येच्या शाळेवर संकट अटळ आहे.

नवीन संचमान्यता धोरण, खासगी शाळांचे वाढते आकर्षण, पटसंख्येतील घट आदी बदलांमुळे जिल्हा परिषद शाळांमसोर संकट उभे झाले आहे.

# बडनेरात २ लाख २० हजारांचा गुटखा जप्त


## दोन दुकानांवर धाड दोन आरोपींना अटक बडनेरा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ बडनेरा–** बडनेरा पोलिसांनी अन्न व औषधी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह नवी वस्ती परिसरातील दोन दुकानांवर धाड टाकून २ लाख २० हजार ४५१ रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. ही कारवाई सोमवार, ३ मार्च रोजी रात्री करण्यात आली.जय परशुराम चव्हाण (३१), रा. मिल चाळ, नवी वस्ती, वडनेरा व नरेश गजानन चुटे (४१) रा. क्रिष्णानगर, अमरावती अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. बडनेरातील नवी वस्ती परिसरातील मौलाना अब्दुल कलाम आझाद मार्केटमधील नॅशनल एग्स नामक दुकानात शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आल्याची माहिती बडनेरा पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी अन्न व औषधी प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी गजानन वामनराव गोरे यांच्यासह सदर दुकानावर धाड टाकली. यावेळी दुकानात १ लाख ३५ हजार २१५ रुपयांचा गुटखा आढळून आला. त्यानुसार पोलिसांनी सदरगुटखा जप्त करून दुकानाचा संचालक जय चव्हाण याला अटक केली. या कारवाईत ८५ हजार २३६ रुपयांचा गुटखा जप्त करून दुकानाचा संचालक नरेश चुटे याला अटक करण्यात आली. ही कारवाई बडनेराचे ठाणेदार सुनील चव्हान, अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांच्या नेतृत्वात पोजीस उपनिरीक्षक सर्जेराव सानप, भगवान गिरी, गणेश तंवर, मंगेश परिमल, इरफान रायलीवाले, प्रवीण देंगेकर, शशिकांत शेळके, अतुल राऊत, विशाल पंडित यांनी केली.

# वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या चिमोटे कुटुंबियाला वनविभागाकडून पाच लाखांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती –** मेळघाटातील केली येथील विनोद चिमोटे यांच्यावर खोंगळा गावाजवळ एका वन्यप्राण्याने हल्ला केला, त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान हा हल्ला वाघाने केल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. दरम्यान विनोद चिमोटे यांना पाच मुली आहेत. वाघाच्या त्या झडपेने या पाचही चिमुकल्यांच्या डोक्यावरील पितृछत्र हरवले आहे.

विनोद चिमोटे हे मासेमारी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. त्यामुळेचते मासे विक्रीसाठी मेळघाटातील जांभली गावात रविवारी असलेल्या बाजारात गेले होते. दरम्यान बाजारातून केली या गावी परत येत असताना मार्गातील खोंगळा या गावापासून काही अंतरावर त्यांच्यावर वाघाने हल्ला केला व यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान शवविच्छेदन अहवालात – विनोद यांचा मृत्यू वन्यजीवाच्या हल्ल्यात झाल्याचे स्पष्ट झाले. तसेच त्यांच्या मृतदेहावर नखे व ओरबाडण्याच्या खुणा दिसून आल्या. विनोद यांचा मृतदेह मुख्य = मार्गापासून एक किमी आतमध्ये ओढत नेला होता. एकंदरीत हल्ल्याची पद्धत व मृतदेह ओढून नेला, यावरून हा हल्ला वाघाचाच असावा, अशी चर्चा मेळघाटात आहे. दरम्यान चिमोटे कुटुंबीयांसाठी विनोद हाच कर्ता व्यक्ती होता. त्यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा रडोंगर कोसळला आहे. त्यांच्या मृत्यूमुळे पाच मुली, पत्नी व कुटुंबातील अन्य सदस्यांचा आधारवडच कोसळला आहे.



बॉक्सवन विभागाकडून कुटुंबाला पाच लाखांची मदत

या दुर्दैवी घटनेनंतर वन विभागाकडून चिमोटे कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. मेळघाट वन्यजीव विभागाचे डीएफओ यशवंत बहाळे व त्यांच्या पथकाने मंगळवारी केली गावात जाऊन चिमोटे कुटुंबीयांना धनादेश सुपूर्द करत त्यांचे सांत्वन केले.

# डोहात अंघोळीसाठी गेलेल्या १४ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

## वलगाव पोलिस ठाणे हद्दीतील जळका हिरापूर येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**अमरावती–** वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जळका हिरापूर येथील १४ वर्षीय मुलाचा डोहातील पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. ही घटना सोमवारी (दि. ३) रात्री समोर आली.विवेक नितीन वंजारी (१४, रा. बैलमारखेडा ह. मु. जळका हिरापूर) असे मृताचे नाव आहे. विवेक मागील काही वर्षांपासून जळका हिरापूर येथे त्याचे मामा गिरीश तायडे यांच्याकडे रहायला होता. सोमवारी दुपारी गिरीश तायडे शेतात गेले होते. त्यानंतर दुपारच्या वेळी विवेक गावालगत वाहणाऱ्या एका नाल्यावर अंघोळीसाठी गेला. या नाल्यातील डोहात असलेल्या पाण्याचा अंदाज न आल्याने विवेक पाण्यात बुडाला. दरम्यान सायंकाळी विवेकचे मामा गिरीश तायडे घरी आले, त्यावेळी त्यांना विवेक घरी दिसला नाही. त्यांनी परिसरात शोधाशोध केली. विवेकचा कुठेही पत्ता लागला नाही. दरम्यान नाल्याकडून येणाऱ्या एका गुराख्याने तायडे यांना सांगितले, की नाल्याजवळ कपडे दिसत आहे. त्यामुळे तातडीने गिरीश तायडे नाल्याजवळ गेले तर तेथे विवेकचे कपडे असल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे विवेकचा डोहातील पाण्यात शोध घेतला. रात्री ८ वाजता विवेकचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. या प्रकरणात वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे

# वडाळीत भरदिवसा गोंडीचा चाकूने भोसकून केला खून

## दुचाकीने जातानाच हल्लेखोरांनी चढवला हल्ला



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५अमरावती** – वडाळी परिसरातील एका गल्लीतून दुचाकीने जाणाऱ्या तरुणावर अनोळखी हल्लेखोरांनी चाकूने हल्ला चढवला. या हल्लयात एमपीडीए भोगून कारागृहातून बाहेर आलेल्या गोंडी ऊर्फ ऋषिकेश उमेश मोडक (२६, व्यंकय्यापुरा, अमरावती) रा. याचा मृत्यू झाला. घटनामंगळवारी दुपारी वाजता घडलीऋषिकेश व त्याचा एक मित्र दुचाकीने वडाळी परिसरातून बाहेर येत असतानाच मुख्य चौकापासून सुमारे शंभर मीटर आत एका गल्लीत हल्लेखोरांनी अचानकपणे ऋषिकेशवर हल्ला चढवला. या वेळी ऋषिकेशची मान, हातावर व इतरत्र चाकूचे अनेक वार होते.यामध्ये ऋषिकेश घटनास्थळी रक्तबंबाळ स्थितीत पडला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. दरम्यान घटनेची माहिती मिळताच डीसीपी सागर पाटील, एसीपी शिवाजी बचाटे, कैलाश पुंडकर, पीआय गोरखनाथ जाधव, नीलेश करे, एपीआय महेंद्र इंगळे यांच्यासह पोलिस ताफा घटनास्थळी दाखल झाला होता. ऋषिकेशविरुद्ध शहरातील पोलिस ठाण्यांमध्ये आठ ते नऊ गुन्हे दाखल आहेत. त्याला यापूर्वी तडीपार करण्यात आले होते. तसेच त्याच्याविरुद्ध एमपीडीए कलमान्वये कारवाई केली होती. गाडगेनगर पोलिसांनी त्याला एमपीडीएमध्ये ६ ऑक्टोबर २०२३ रोजी स्थानबद्ध केले होते. तसेच ५ ऑक्टोबर २०२४ रोजी त्याची वर्षभरानंतर कारागृहातून सुटका झाली होती. दरम्यान त्याच्यावर हल्ला करणारे हल्लेखोर कोण, याबाबत शहर पोलिस तपास करत आहेत.

# वडेट्टीवार समर्थकांचा भाजपमध्ये प्रवेश, वडेट्टीवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाचीही चर्चा ?



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ चंद्रपूर :-** काँग्रेस विधीमंडळ नेते तथा माजी विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार) प्रवेश घेणार ही चर्चा जिल्ह्यात सर्वत्र सुरू आहे. असे असतानाच वडेट्टीवार यांचे खंदे समर्थक तथा ब्रम्हपुरी नगर परिषदेचे माजी गटनेते विलास विखार, माजी उपाध्यक्ष डॉ.सतिश कावळे, गौरव अशोक भैय्या, माजी पंचायत समिती सभापती नामदेव लांजेवार, सुरेश दुर्वे यांनी मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केल्याने काँग्रेसला खिंडार पडली आहे. विशेष म्हणजे आठ दिवसांपूर्वी याच कार्यकर्त्यांसह वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरीत स्वत:च्या बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाची चर्चा केल्याची माहिती आहे.

काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार मागील पाच वर्षापासून सत्तेपासून दूर आहेत. वडेट्टीवार सत्तेत नसल्यामुळे अस्वस्थ आहेत. याच अस्वस्थतेतून आठ दिवसांपूर्वी वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी येथील निवासस्थानी काही विश्वासू सहकाऱ्यांना बोलावून घेतले. यावेळी वडेट्टीवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेशाचा प्रस्ताव सर्वांसमोर ठेवला.प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, चिमूरचे आमदार बंटी भांगडिया यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष प्रवेश झाला. भाजपा नेतृत्व आणि कार्यावर विश्वास ठेवूनच मागच्या ५० वर्षांपासून काँग्रेसशी जोडलेल्या भैय्या कुटुंबातील अशोक भैय्याजी यांचे पुत्र गौरव, विलास विखार विजय वडेट्टीवार यांचे खंदे समर्थक कावळे यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. या सर्वांचा यथोचित सन्मान राखला जाईल. नव्याने प्रवेश केलेल्या सर्वांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सामील व्हावे, प्रमुख नेत्यांना सक्रीय सदस्य बनवावे, भाजपा संघटना वाढीचे काम करावे असे आवाहन बावनकुळे यांनी केले. पक्ष संघटना तुमच्या सदैव पाठीशी राहील असे आश्वासनही त्यांनी दिले. भाजपा मध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये सुखदेव खेने, स्वप्नील सावरकर, मोहन वैद्य, बन्सीलाल कुर्जेकार, निलेश चिंचुरकर आदींचा समावेश आहे. या पक्ष प्रवेशामुळे काँग्रेस पक्षाला खिंडार पडली आहे.

# सेवाभावाचा झरा आटला ; पाणपोई झाल्या दिसेनाशा




विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती २६उन्हाळ्याची चाहूल लागताच पूर्वी चौकाचौकात पाणपोई दिसून येत होत्या. जसजसे ऊन भडकायचे तशी पाणपोईवर वर्दळही दुप्टीस पडायची. रस्त्याने जाता-जाता घशाला पडलेली कोरड दूर करताना चार घोट थंडगार पाणी घशाखाली उतरवले की हायसे वाटायचे. मात्र मार्च महिन्याला सुरुवात होऊनही जिल्ह्यात पाणपोईच दिसेनाशा झाल्या आहेत.

दरवर्षी सेवाभावाने पाणपोई सुरू करणाऱ्या सेवाभावी संस्था,राजकीय पक्षांच्या सेवाभावाचा झरा आटल्याचे दिसून येत आहे.अमरावती शहराचे तापमान ४९ते ५० डिग्री पर्यंत जात असते त्यामुळे उन्हाळ्यात थोडेसे बाहेर जरी पडले, तर जीव कासावीस होतो. घसा कोरडा पडतो. क्षणाक्षणाला तहान भागविण्यासाठी पाण्याची गरज पडते. त्यामुळे अनेक सामाजिक संघटना अमरावती शहरात पाणपोई सुरू करत होत्या. या पाणपोईवर थंडगार पाण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी दिसायची. मात्र मार्च महिन्याला सुरुवात होऊन तापमानाचा पारा ३७ अंशांच्या जवळपास पोहोचला तरीही पाणपोई दिसेनाशा झाल्याने सेवाभावाचा झरा आटला की काय, असा प्रश्न पडत आहे.

# धनंजय मुंडे यांनी दिला राजीनामा: पाठराखण करणाऱ्या नामदेवशास्त्रींनी बोलणे टाळले

## प्रकृती खराब असल्याचे दिले कारण





विदर्भ प्रजासत्ताक

दि.५बीड – धनंजय मुंडेंच्या पाठीशी भगवान गड भक्कमपणे उभा असून मुंडे गुन्हेगार नाहीत, असे नामदेव शास्त्री यांनी म्हटले होते. त्यांच्या या विधानावरून त्यांच्यावर जोरदार टीका देखील करण्यात आली होती. आता धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर माध्यमांनी त्यांच्याशी भगवानगडावर जाऊन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रकृती बीडघडल्याचे कारण देत त्यांनी बोलणे टाळले आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो व व्हिडिओ समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. याच दबावात आज धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देखील दिला आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून केली जात होती. मात्र धनंजय मुंडे राजीनामा देण्यास तयार नव्हते. मात्र, अखेर महाराष्ट्रातल्या जनतेचा संताप व विरोधकांचा दबाव यामुळे राजीनामा द्यावा लागला आहे.

धनंजय मुंडे यांनी राजीनाम्याचे कारण वैद्यकीय सांगितले आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नैतिकतेतून राजीनामा दिल्याची प्रतिक्रिया दिली होती. धनंजय मुंडे यांनी दिलेले कारण व अजित पवारांनी दिलेली प्रतिक्रिया यात विसंगती दिसून आल्याने देखील संताप व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, धनंजय मुंडे यांची पाठराखण करणारे महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर प्रतिक्रिया देणे मात्र टाळले आहे. प्रकृतीचे कारण देत त्यांनी माध्यमांना बोलण्याचे टाळले आहे. काही दिवसांपूर्वी नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडेंच्या पाठीशी भगवान गड भक्कमपणे उभा असून मुंडे गुन्हेगार नाहीत असे पत्रकार परिषद घेत छातीठोकपणे सांगितले होते. मात्र, आता त्यांनी यावर प्रतिक्रिया देणे देखील टाळले असल्याचे दिसून आले आहे.

# पाणी, स्वच्छतेसाठी झटणाऱ्या महिलांचा होणार सन्मान

## मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचा उपक्रम

### जागतिक महिला दिनाचे औचित्य





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** :स्वच्छ भारत मिशन (ग्रा)टप्पा-०२ व जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागात पाणी, स्वच्छता क्षेत्रात अंमलबजावणी करिता महिलांचे अमुल्य योगदान आहे. अशा स्वच्छता क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून केल्या जात आहे.

स्वच्छता क्षेत्रात नेतृत्व करणे, स्वच्छता मालमत्तेचे व्यवस्थापन करणे, स्वच्छतेसाठी प्रोत्साहन देणे व स्वच्छतेची शाश्वतता सुनिश्चित करणे, जनजागृती करणे आदी बाबींच्या अनुषंगाने महिलांचा सक्रिय, सहभाग आवश्यक आहे. जेणे करुन गावे खऱ्या अर्थाने जलसमृध्दी होतील आणि शाश्वतस्वच्छतेच्या दिशेने वाटचाल करतील हाच धागा पकडून ग्रामीण भागात पाणी व स्वच्छता क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा तालुका व ग्रामस्तरावर सत्कार करण्यात येणार असून, जागतीक महिला दिना निमीत्त विविध उपक्रम सुध्दा महिला सहभागातून राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत ग्रामस्तरवर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वच्छता कामगार महिला, स्वच्छतेच्या मालमत्तेचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती संबधीत सुयोग्य व्यवस्थापन करणारे महिला नेतृत्व, किशोवयीन चॅर्मपयन, पाणी गुणवत्ता व सनियंत्रण करणाऱ्या महिला आदी महिलांचा तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित करुन त्याना सन्मानित करण्यात येणार आहे. याअंतर्गत तालुक्यातील गावांमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन पाणी स्वच्छता व आरोग्य या बाबत येणाऱ्या अडीअडचणी बाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच महिला दिनाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या तसेचपाणी, स्वच्छता व आरोग्य संबधित उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांच्या प्रेरणादायी कथांना समाज माध्यमे व कथा कथनाच्या माध्यमातून प्रचार-प्रसिध्दी करणे आदी उपक्रमांचे आयोजन याअंतर्गत केले जाणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी दिली.

# अमरावती-परतवाडा महामार्गावरील वाळलेली वृक्ष धोकादायक



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५वलगाव**

अमरावती- परतवाडा महामार्गावरील वलगाव ते वायगाव दरम्यान काही वृक्ष वाळलेले असून ते चक्क रस्त्यावर झुकली आहे. या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष असल्याने वाहकांकडून याचा संताप व्यक्त होत आहे. यामुळे रस्त्यावर वृक्ष कोसळून अपघात होण्याची शक्यता वर्तविली आहे.

अमरावती ते परतवाडा या प्रमुख महामार्गावर वायगाव ते वलगाव दरम्यान रस्त्याच्या कडेला मोठी वृक्ष वाळलेली आहेत.

याशिवाय ते रस्त्यावर देखील झुकलेली आहे. आगामी उन्हाळा बघता हवेमुळे सदरची वृक्ष केव्हाही रस्त्यावर कोलमडून पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अपघाताची शक्यतावर्तविली जात आहे. या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. त्यामुळे वरिष्ठांनी याची दखल घेऊन रस्त्यावरील वाळलेले झाडांची कटाई करण्याची मागणी जोर धरत आहे.-

# लाईनमन दिनी तांत्रिक कर्मचाऱ्यांना गौरविले

## नारगावंडी येथील उपविभागीय कार्यालयात कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५धामणगाव रेल्वे**– शहराबाहेरील नारगावंडी येथील महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्य तांत्रिक कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसिलदार आशिष वीर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती ग्रामीण विभागाचे उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड, धामणगाव रेल्वे उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता राहूल उमरे, कामगार कल्याण मंडळ धामणगावचे संचालक विनोद इंगळे, शहर सहाय्यक अभियंता परेश कनाते आदींची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महावितरण कंपनीतील तांत्रिक कर्मचारी यांचे कामाचे महत्व व वीज सुरक्षिततेचे तांत्रिक कामातील महत्व विषद केले. यानंतर धामणगाव रेल्वे उपविभागातील सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गुणगौरव करण्यात आला. यादरम्यान शशीकांत मते (वरिष्ठ तंत्रज्ञ - मंगरूळ दस्तगीर), निलेश सांगोळे (वरिष्ठ तंत्रज्ञ - तळेगाव दशासर), धीरज पांडे (प्रधान तंत्रज्ञ - मंगरूळ दस्तगीर), दीपक राऊत - (वरिष्ठ यंत्रचालक - मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र) व गौरव वानखेडे (सोलर कंत्राटदार) यांनी सुध्दा आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मंगरूळ दस्तगीरचे सहाय्यक अभियंता अख्तर अजीज खान व कनिष्ठ अभियंता आकाश पाचभाई यांनी केले. तर आभार ग्रामीण वितरण केंद्राचे कनिष्ठ अभियंता आशिष पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता उमेश कांबळे (वरिष्ठ तंत्रज्ञ), शैलेश ढवळे (सुरक्षा रक्षक), प्रितम चांदेकर (वरिष्ठ तंत्रज्ञ), सुनील पडघन (वरिष्ठ तंत्रज्ञ), अंकुश पिसे (वरिष्ठ तंत्रज्ञ), सचिन खोडके (यंत्रचालक), ललित शहाणे ( प्रशिक्षणार्थी), अनुप (प्रशिक्षणार्थी) यांसह इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

यावेळी सर्व तांत्रिक व कंत्राटी कामगार तसेच बिलींग कर्मचारी, यंत्रचालक वर्ग, सुरक्षा रक्षक उपस्थित होते.

# नवनीत राणा कडाडल्या अबू आझमींचे निलंबन

# आता औरंगजेबाची कबर महाराष्ट्राबाहेर फेकून द्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती :** समाजवादी पार्टीचे नेते व मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार अबू आझमी यांनी मुघल शासक औरंगजेबाच्या बाबत केलेल्या एका वक्तव्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले आहे. अधिवेशन संपेपर्यंत अबू आझमी हे निलंबित आमदार असणार आहेत. अबू आझमी यांनी औरंगजेब क्रूर प्रशासक नव्हता, असे म्हटले होते. त्यांच्या या विधानावर अनेकांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या होत्या. या दरम्यान भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी अबू आझमी यांच्यावरील कारवाईचे स्वागत केले आहे.नवनीत राणा म्हणाल्या, अबू आझमी यांनी मुघल शासक औरंगजेबाच्या बाबतीत केलेल्या वक्तव्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने आज ज्या पद्धतीने कारवाई केली, त्याचा आनंद आहे. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता, त्याने चांगल्या पद्धतीने राज्य चालविले, असे अबू आझमी म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याच्या विरोधात देवेंद्र फडणवीस सरकारने त्यांना निलंबित केले आहे. आमच्या या सरकाला अजून एक विनंती आहे, ज्या पद्धतीने औरंगजेबाचे विचार आमच्या महाराष्ट्राला मान्य नाहीत, त्याच पद्धतीने खुलताबाद येथे औरंगजेबाची जी कबर आहे, ती लवकरात लवकर उखडून महाराष्ट्राच्या बाहेर फेकली पाहिजे.जे औरंगजेबाचा गुणगौरव करतात, ते औरंगजेबाला बाप मानतात, ज्यांना औरंगजेब याच्यावर प्रेम आहे, त्यांना असाच धडा शिकवला पाहिजे. या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार चालतात, औरंगजेबाचे नाहीत, हे सर्वांनी जाणून घ्यावे.



# बेलोरा विमानतळावर पीएपीआयचे हवाई कॅलिब्रेशन यशस्वीपणे पूर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**
अमरावतीमधील बेलोरा विमानतळाने प्रेसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर (पीएपीआय) चे हवाई कॅलिब्रेशन यशस्वीपणे पूर्णकेले आहे. जेविमानतळाच्या पूर्ण कार्यरत होण्याच्या स्थितीच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा आहे. विमानचालन सुरक्षिततेत आवश्यक साधन असलेले पापि प्रणाली, धावपट्टीवर येणाऱ्या विमानांना अप्रोच दरम्यान योग्य गनाइड स्लोप राखण्यासाठी आणि सुरक्षित लँडींगसाठी सुनिश्चित करते. पापि प्रणालीचे कॅलिब्रेशन विमानतळाच्या पायाभूत सुविधांचा एक महत्त्वाचा घटक आहे. यामुळे ते आंतरराष्ट्रीय विमानचालन सुरक्षा मानकांना पूर्ण करत असून विमानतळ पूर्णपणे कार्यरत होण्याच्या मार्गावरील एक पुढचे पाऊल मानल्याजात असून लवकरच टेकऑफ करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती विमानतळावरून उड्डाण ऑपरेशन्ससाठी सुरक्षित, कार्यक्षम आणि विश्वसनीय सेवा प्रदान करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. सर्व उपकरणे आंतरराष्ट्रीय विमानचालन संस्थांद्वारे निर्धारित केलेल्या कठोर मानकांना पूर्ण करतात की नाही, याची खात्री करण्यासाठी विमानतळ प्रमाणित विमान चालन तज्ज्ञांसोबत तत्परतेने कार्यरत आहे.पापि हवाई कॅलिब्रेशन स्वतः उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (व्हीसीएमडी) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. स्वाती पांडे यांनी प्रत्यक्ष याबाबतचा आढावा घेतला.म मंगळवारी त्या कॅलिब्रेशन फ्लाइट पाहण्यासाठी मुंबईहून आल्या होत्या.भारतीय विमानतळ प्राधिकरण, फ्लाइट इन्स्पेक्शन यूनिटने बीच एअर ३६०ईआर टर्बोप्रॉपने विमानतळावर कॅलिब्रेशन केले. जे ७ सदस्यांच्या क्रूसह बेंगळुरूजून अमरावती विमानतळावर कॅप्टन अनुप काचरू आणि विमानचालन तज्ञांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.विमानाने २६/०८ धावपट्टीच्या बाजूने अमरावती विमानतळावरून उड्डाण केले आणि यशस्वीरित्या कॅलिब्रेशन पूर्ण केले. पॅसेंजर टर्मिनल बिल्डिंग, एटीसी टॉवर्स आणि इतर सिव्हिल वर्क्स आधीच पूर्ण झाल्यामुळे, अमरावतीहून लवकरच पूर्ण वाणिज्यिक उड्डाणे सुरू होण्यापूर्वी शेवटच्या काही सुरक्षा तपासण्या केल्या जात आहेत. अलायन्स एअर प्रादेशिक कनेक्टिविटी योजने अंतर्गत मुंबई अमरावती-मुंबई मार्गावर एटीआर ७२ सह नियोजित ऑपरेशन्स सुरू करतील.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

## धामणगाव तालुक्याला मिळाले३ कोटी ६९ लाख रुपये

### आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धा.रेल्वे:-** तालुक्यातील १ हजार ३७८ नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ३ कोटी ६९ लाख रुपये अनुदान आमदार प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नाने मिळणार आहे.यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या सततच्या पावसाने तालुक्यातीलतील १ हजार २६ हेक्टर क्षेत्रातील संत्रा फळबागा



बाधित झाल्या आहेत. त्याचा थेट फटका १ हजार ३७८ शेतकऱ्यांना बसला होता.प्रशासनाने या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी अनुदानाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता.दरम्यान आमदार प्रतापदादा अडसड यांनी यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा व प्रयत्न केले.त्यामुळे तालुक्यातील १ हजार ३७८ नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ३ कोटी ६९ लाख रुपये अनुदान मिळणार आहे.यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यासाठी प्रक्रिया राबवली जात असल्याची माहिती तहसीलदार अभिनय घोरपडे यांनी दिली.

# कुटुंबाचा आधार गेला २० हजार मिळाले का ?

## शासनाच्या योजनेतून मिळते कुटुंबाला अर्थसाह्य

### दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील स्त्री, पुरुषाचा अपघात किंवा नेसर्गिक मृत्यू झाल्यास मिळतो एकरकमी लाभ

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती** - दारिद्र्य



रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या १८ ते ५९ वयोगटातील कर्त्या स्त्री, पुरुषाचा मृत्यू झाल्यास राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेत संबंधित कुटुंबीयांना एकरकमी २० हजार रुपये दिले जातात.

या योजनेची अंमलबजावणी महसूल प्रशासनातर्फे निराधार विभागांतर्गत केली जाते. इच्छुकांनी तालुका पातळीवरील तहसील कार्यालयात संपर्क साधून विहित नमुन्यातील अर्ज भरून आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत अर्ज दाखल केल्यानंतर संबंधित तलाठ्याकडे चौकशीसाठी जातात. कागदपत्रांची छाननी करून सविस्तर अहवाल सादर केला जातो.

शासनाने नेमलेल्या शासकीय समितीसमोर हा अर्ज जातो.

तिथे पात्र असलेल्या अर्जांना मंजुरी दिली जाते. त्यानंतर सर्व पात्र लाभार्थ्यांची रक्कम कोषागारातून खात्यावर जमा होते.अमरावती जिल्ह्यात मागील वर्षभरात अनेकांनी अर्ज दाखल केले आहेत. आता शासनाकडून अनुदान मिळाले असल्याने लाभार्थ्यांच्या खात्यात लवकरच जमा होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून मिळाली आहे.

घरातील कर्ता पुरुषाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना सावरण्यासाठी अर्थसहाय्य योजने अंतर्गत २० हजार रूपये लाभ दिला जातो. कर्ता पुरूष गेल्याने विस्कळीत स्थिती सुधारण्यास यामुळे मदत मिळते.

### काय आहे राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना ?

या योजनेंतर्गत, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना एकरकमी मदत दिली आते. जेव्हा कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू होतो त्यांच्या वारसांना आर्थिक मदत दिली जाते. या योजनेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांतील कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास तातडीने संपर्क साधून अर्ज करावा. यासाठी कुटुंबीयांना तीन वर्षापर्यंत प्रसासनाकडे अर्ज करता येतो.योजनेच्या लाभासाठी तहसील निराधार योजना कार्यालयात संपर्क साधावा.

### काय कागदपत्रे लागतात ?

ओळखीचा पुरावा, मतदार ओळखपत्र, असेल तर वाहन चालक परवाना, पॅनकार्ड, पाणीपट्टी पावती, सात बारा, आठ अ, भाडेपावती, उत्पन्नाचा दाखला, रहिवास दाखला, बोनाफाइड प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र.

### योजनेची अंमलबजावणी महसूल प्रशासनातर्फे

या योजनेची अंमलबजावणी महसूल प्रशासनातर्फे केली जाते. इच्छुकांनी तालुका पातळीवरील तहसील कार्यालयात संपर्क साधून अर्ज भरून आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

# मंत्री जयकुमार रावल यांनी माजी राष्ट्रपतींची जमीन बळकावली

## प्रतिभाताई पाटील यांची २६ एकर जमीन हडपल्याचा आरोप, जमीन परत करण्याचे न्यायालयाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५पुणे-** राज्याचे पणन मंत्री व धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची तब्बल २६ एकर जमीन हडप केल्याचे समोर आले आहे. हा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची दिंडाईचा शिवारातील २६ एकर जमीन जयकुमार रावल यांनी हाड केल्याचा आरोप अनिल गोटे यांनी केला आहे.

याप्रकरणी धुळे जिल्हा न्यायालयाने रावल कुटुंबाने राष्ट्रपतींची हडप केलेली जमीन त्यांना परत करण्याचे आदेश दिल्याचे देखील माहिती पुढे आली आहे. अनिल गोटे यांनी यावेळी जयकुमार रावल यांच्यावर जोरदार टीका केली आहे. अनिल गोटे म्हणाले, देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती असलेल्या प्रतिभाताई पाटील यांना देखील जयकुमार रावल आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सोडले नसून इतर गरीब कुटुंबीयांचे काय? असा प्रश्न देखील अनिल गोटे यांनी उपस्थित केला आहे.

जयकुमार रावल आणि त्यांच्या कुटुंबीयांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची जमीन हडप केल्याचा प्रकार समोर



आल्यानंतर शिंदखेडातील गरिबांना न्याय कोण देणार? असा देखील प्रश्न अनिल गोटे यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, जयकुमार रावल हे २००४ पासून ते २०२४ असे सलग पाचवेळा विधानसभा निवडणुकीत विजयी झाले आहेत. २०१६ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रिपद देखील त्यांनी भूषविले आहे. पर्यटन, अन्न औषध, राजशिष्टाचार या खात्याचा कारभार त्यांनी सांभळला. तर २०१४ च्या निवडणूकीत पाचव्यांदा त्यांनी ९६ लाख मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला. दरम्यान, धुळे जिल्ह्यात पहिल्यांदा महायुतीचे सर्व ५ आमदार निवडून आणण्यात रावल यांचा मोठा वाटा असल्याचेही बोलल्या जात आहे. त्यात आता जयकुमार रावल यांच्याकडे मंत्रीपदही देण्यात आले आहे.

# मंदिर व्यवस्थापन आदर्श करण्यासाठी मंदिर विश्वस्त, पुजारी, भक्त आणि अभ्यासक यांचे संघटन होणे आवश्यक ! - महाराष्ट्र मंदिर महासंघ

## ९ मार्च रोजी जगाहीरपूर येथे ‘महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती**
छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी मंदिरांचे संरक्षण अन् जीर्णोद्धार केला; मात्र आज मंदिरांचे सरकारीकरण, तसेच मंदिरांच्या भूमींवर अतिक्रमण केले जात आहे, तसेच ‘वक्फ बोर्ड’द्वारे हिंदूंच्या मंदिरांच्या भूमी बळकावल्या जात आहेत. त्यामुळे मंदिर संस्कृती आणि श्रद्धा यांवर परिणाम होत आहे. मंदिर व्यवस्थापन आदर्श करण्यासाठी मंदिर विश्वास्त, पुजारी, भक्त आणि अभ्यासक यांचे संघटन होणे आवश्यक आहे. यासाठी श्री महारूद्र मारूती संस्थान, जहागिरपूर; श्री नागेश्वर महादेव संस्थान, धामंत्री; श्री पिंगळादेवी संस्थान, नेरपिंगळाई; महाराष्ट्र मंदिर महासंघ; देवस्थान सेवा समिती, विदर्भ;



हिंदु जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ९ मार्च या दिवशी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत जहागीरपुर येथील श्री. महारुद्र मारूती संस्थान, येथे ‘द्वितीय महाराष्ट्र मंदिर-न्यास अधिवेशन (अमरावती विभाग)’चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे महाराष्ट्र पदाधिकारी श्री. अनुप जयस्वाल यांनी ५ मार्च या दिवशी येथे पत्रकार परिषदेत दिली.अमरावती येथील जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

हिंदु जनजागृती समितीचे श्री. नीलेश टवलारे यांनी माहिती दिली की, हिंदूंचे कोणतेही मंदिर कुठल्याही सरकारच्या कह्यात असता कामा नये, असा एकमुखी निर्णय प्रयागराज येथील महाकुंभमेळामध्ये आखाडा परिषदेपासून साधू-संत आणि सर्व हिंदुत्वनिष्ठ संघटना यांनी घेतला आहे. आज देशभरात कोणतीही मशीद किंवा चर्च सरकारच्या कह्यात नाही; मग मंदिरे सरकारच्या कह्यात का? असा प्रश्न भक्तांना पडतो. यासाठी आयोजित मंदिर न्यास अधिवेशनाला अमरावती जिल्ह्यातील सर्व प्रमुख मठ-मंदिराचे संत, महंत, विश्वस्त, व्यवस्थापक, पूजारी यांची ५०० हून अधिक उपस्थिती असणार आहे. यासोबतच, मंदिरांच्या भूमी बळकवणाऱ्यांच्या विरोधात अँटी लँड ग्रॅबिंग ऍक्ट विषयी, देवस्थान शेतजमीनी कुळकायद्या विषयी अडचणी, मंदिरांच्या विविध समस्या, कायदेशीर मार्गदर्शन अशा विविध विषयांवर या अधिवेशनात चर्चा करण्यात येणार आहे. अधिवेशनासाठी अमरावती जिल्ह्यातील १३ तालुक्यात बैठका, संपर्क या माध्यमातून प्रसार करण्यात आला असून उत्स्फुर्त प्रतिसाद लाभत आहे.श्री. महारूद्र मारूती संस्थानचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाश परतानी यांनी सर्व मंदिर क्षेत्रातील मान्यवरांनी या अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले.

# महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटनेचे विभागीय कार्यालयावर जोरदार निदर्शने

## प्रलंबित आर्थिक व अन्य प्रश्नांची सोडवणूक न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा !!!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती-** एस.टी.. कामगारांना राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीचा दर लागू आहे. असे असताना सन २०१८ पासून महागाई भत्याची थकबाकी प्रलंबित आहे. मा. न्यायालयाने थकबाकी देण्याबाबतचा निर्णय देऊनसुध्दा अंमलबजावणी होत नाही. आता शासकीय कर्मचा-यांना माहे जुलै २०२४ पासून महागाई भत्याचा दर ५३ टक्के लागू केलेला असून सदरचा महागाई भत्ता थकबाकी माहे फेब्रुवारी २०२५ देय मार्च २०२५ च्या वेतनात देण्यात आलेला आहे. मात्र एस.टी. कामगारांना महागाई भत्ता अद्याप ४६ टक्केच दिला जात आहे. त्यामुळे शासकीय कर्मचा-यांप्रमाणे ५३ टक्के महागाई भत्ता एस.टी. कामगारांना थकबाकीसह लागू करण्यात यावा. तसेच घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीची थकबाकी एप्रिल २०१६ ते ऑक्टोबर २०२१ पर्यंत प्रलंबित आहे तो तातडीने देण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र एस.टी. कामगार



संघटनेच्या अमरावती विभागाच्या वतीने विभागीय कार्यालयावर जोरदार निदर्शने केलीत या वेळी कर्मचाऱ्यांनी केलेल्या गोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

माहे एप्रिल २०२० पासून कामगारांच्या मूळ वेतनात रु.६५००/- वाढ करून वेतन निश्चिती करण्यात आली. त्यानंतर माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२४ या कालावधीच्या थकबाकीबाबत नंतर निर्णय घेण्याचे मान्य केलेले आहे. माहे एप्रिल २०२४ पासून वाढीव वेतन रोखीने देण्याच्या सूचना असून सदर थकबाकीचे हप्ते माहे जानेवारी २०२५ देय फेब्रुवारी २०२५ मध्ये संपलेले आहेत. त्यामुळे कामगारांचे वेतन कमी होणार आहे. परिणामी कामगारांत असंतोष पसरलेला आहे. म्हणून निरनिराळ्या बाबींच्या थकबाकीच्या अधिन राहून सध्या कामगारांना मिळत असलेले थकबाकीचे हप्ते तसेच पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे.तसेच भविष्य निर्वाह निधीची उचल वेळेवर द्या, जाचक शिस्त व आवेदन कार्यपध्दती रद्द करा, प्रवाशी भाड्यामध्ये केलेल्या भाड्याची अंमलबजावणी करताना पुर्वीप्रमाणेच रू.५ च्या पटीत वाढ करा, आर.टी.ओ. विभागाकडून दंडात्कामक कारवाई करताना चालकाचा दोष नसताना केलेली दंडात्मक कारवाई रद्द करा.महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर थकबाकीबाबत महामंडळ निर्णय घेईल असे प्रशासनाने लेखी पत्राव्दारे संघटनेला कळविले आहे. मात्र संघटनेचा त्यास ठाम विरोध असून एस. टी. ची आर्थिक स्थिती निर्माण होण्यास कामगार जबाबदार नसल्याने कामगारांचे मान्य देय थकबाकी प्रलंबित महागाई भत्याची थकबाकी, घरभाडे भत्याची थकबाकी, वार्षिक वेतनवाढीची थकबाकी व वाढीव वेतनाचा हप्ता कपात न करता तसाच पुढे चालू ठेवावा बाबींची पुर्तता न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा हि यावेळी देण्यात आला. यावेळी विभागीय अध्यक्ष मसूद खान,विभागीय सचिव मोहित देशमूख सभासद उपस्थित होते.